# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org


## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना (सुधारित)

**विषय:– महाप्रसाद विभागात बनविण्यात येणाऱ्या लाडुमध्ये वापरण्याकरीता जायफळ पावडरचा पुरवठा करण्यासाठी दरपत्रके मागवणेबाबत**

सन २०२५–२६ या वर्षभराच्या कालावधीकरीता महाप्रसाद विभागात बनविण्यात येणाऱ्या लाडूमध्ये वापरण्याकरीता जायफळ पावडरची विहित पध्दतीने खरेदी करण्याकरीता मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| दरपत्रके प्रसिध्द दिनांक | –: शनिवार दि. १२ एप्रिल, २०२५ |
| कच्चा माल तपासणीसाठी सादर करावयाचा अंतिम दिनांक | –: गुरूवार दि. १७ एप्रिल, २०२५ सांयकाळी ६.०० वा. |
| दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | –: गुरूवार दि. २४ एप्रिल, २०२५ दु. २.०० वा |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | –: शुक्रवार दि. २५ एप्रिल, २०२५ दु. २.०० वा |

### अटी व शर्ती

१) दरपत्रकधारकाने दरपत्रक सादर करतांना तांत्रिक लिफाफा व मुल्य लिफाफा अशी दोन स्वतंत्र लिफाफे मोहोरबंद लखोटयात लाखेने सिल करून सादर करावीत. मोहोरबंद लिफाफ्यावर कामाच्या विषयाबाबतचा उल्लेख असावा.

२) दरपत्रकामध्ये सर्व समावेशक खर्चासह मूळ दर असावा व कर अतिरीक्त असा उल्लेख करावा.

३) दरपत्रकधारकाने मोहरबंद तांत्रिक लखोटयात साक्षांकीत करुन सादर करावयाची कागदपत्रे
   (अ) आयकर नोंदणी पॅनकार्ड
   (ब) कंपनी नोंदणी दाखला/सेवाकर जी एस टी नोंदणी दाखला
   (क) अद्ययावत एफ. एस. एस. ए. आय. प्रमाणपत्र (Fassai Registration Certificate)
   (ड) वार्षिक उलाढालीसंबंधित सनदी लेखापालाचे मागील तीन वर्षाचे प्रमाणपत्र

४) अपूर्ण कागदपत्रासहित सादर केलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दरपत्रके स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा संपूर्ण अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे.

५) न्यासास पुरवठा करावयाचा कच्चा माल व प्रयोगशाळा तपासणीसाठी सादर करावयाचा कच्चा माल FSSAI standards अथवा न्यासाने सोबत परिष्ठमध्ये दिलेल्या विनिर्देशानुसारच (Specification) असावा. प्रयोगशाळा तपासणी अहवालाच्या निकषावर पुरवठाधारक अंतिम करण्यात येईल. अशी कार्यवाही करताना कच्च्या मालाच्या गुणवत्तेचा, प्रयोगशाळा तपासणी अहवालाचा प्रथम विचार करण्यात येईल. केवळ न्युनतम दर प्राप्त झाला म्हणून दरपत्रक स्विकारण्याचे बंधन न्यासास/समितीस असणार नाही.

६) पुरवठादारांची वार्षिक उलाढाल किमान रू. ८,००,०००/– असणे आवश्यक असून याबाबतचे सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

७) दरपत्रकाच्या मंजुरीनंतर कार्यादेश दिल्यावर १५ दिवसाच्या आत पुरवठादाराने पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा करावयाच्या एकूण मालाच्या किंमतीच्या ५ टक्के रक्कमेची बॅक गॅरेंटी न्यासास सादर करणे बंधनकारक आहे. बॅक गॅरेंटी राष्ट्रीयीकृत वा अनुसूचित बॅकेची असणे आवश्यक आहे.

८) सदर प्रक्रियेअंती पुरवठादारानेदर सादर केलेले वर्षभरासाठी कायम राहतील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव ठेका कालावधीत भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास पुर्णत: किंवा अंशत: बॅक गॅरेंटीमधील रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. याप्रकरणी न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील.

९) पुरवठादाराने जायफळ पावडर चे नमुने दि. १६ एप्रिल,२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत न्यासास सादर करणे आवश्यक राहील. सदर नमुने सादर करतांना यासाठीचे तपासणी शुल्क रू १२००/– इतकी रक्कम मंदिरातील काऊंटर क्र. ५ अभिषेक/देणगी कक्ष येथे जमा करून त्याची पावती नमुन्यासप्रतिक्षालय इमारतीतील तळमजल्यावरील टपाल कक्ष येथे सादर करावी. यासंबंधीच्या अधिक माहितीसाठी श्री. विजय खापणे संपर्क क्र. ९५९४८८५८८८ यांच्याशी संपर्क करावा

१०) पुरवठादाराने २०० ग्रॅम जायफळ पावडर दोन स्वतंत्र बरण्यांमध्ये (प्रत्येकी १००ग्रॅम) सीलबंद करून सादर करावे.

११) न्यासाच्या आवश्यकतेनुसार दरमहा अथवा कमी जास्त मुदतीत मालाची मागणी केली जाईल. एकदम सर्व माल घेतला जाणार नाही. मागणीनुसार माल स्विकारला जाईल तसेच मागणीपेक्षा जास्त आलेला माल स्विकारला जाणार नाही. मालाचे परिमाण अंदाजे असल्याने, प्रत्यक्षात कमी–जास्त मागणी होवू शकेल, त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

१२) पुरवठादाराने मालाची पोहोच स्वखर्चाने श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई येथे न्यासाचे खरेदी विभागाच्या गोडाऊनमध्ये पॅकींग व फॉरवर्डींगसह दिली पाहिजे. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाकडून मालाच्या वाहतुकीचा व वाराईचा खर्च वेगळा दिला जाणार नाही. माल खरेदी विभागाच्या गोडाऊन शिवाय इतरत्र उतरवू नये. असे केल्यास माल गोडाऊनमध्ये पोहचविण्याचे लेबर चार्जेस बिलातून कपात करण्यात येईल.

१३) निविदाकाराने पुरवठा आदेश निर्गमित झाल्यापासून कमाल पाच दिवसात मालाचा पुरवठा करणे आवश्यक असेल. विहित मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यामुळे न्यासाची अडचण/नुकसान होऊ नये म्हणून न्यासाला बाजार भावाने आवश्यकतेनुसार किंवा पुरवठा आदेशात नमूद परिमाणाचा माल खरेदी करण्याचे अधिकार/मुभा असेल. बाजारभावाने खरेदी केल्यामुळे जादा अदा केलेल्या रकमेची भरपाई पुरवठादारास करावी लागेल. सदर भरपाई देयकाच्या रकमेतून वा बयाना रकमेतून करण्यात येईल

१४) न्यासास पुरवठा केलेल्या मालाची प्रयोगशाळा तपासणी करण्यात येईल. सदर तपासणी शासकीय / निमशासकीय / बृहनमुंबई महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाकडील प्रयोगशाळेतून अथवा अन्न व औषध प्रशासनाने प्राधिकृत केलेल्या प्रयोगशाळेतून करणेत येईल. त्याकरीता होणारा खर्च आपण सादर केलेल्या देयकातून वजा करुन देयक अदा करण्यात येईल. त्याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही. दिलेला माल FSSAI Standards किंवा विनिर्देशानुसार नसल्यास अश्या पुरवठा केलेल्या मालासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

अ) अपात्र/सदोष ठरलेला माल परत घेवून त्याऐवजी विनिर्देशित गुणवत्तेचा व दर्जेदार माल कमाल चार दिवसांत पुरविणे पुरवठाधारकास बंधनकारक राहील. अपात्र/सदोष वापरलेल्या मालाचे देयक अदा करताना त्यामधून २०% कपात दंड म्हणून करण्यात येईल.

ब) न्यासास पुरवठा केलेला अपात्र/सदोष माल एका आठवडयामध्ये स्वखर्चाने व जबाबदारीने परत नेणे पुरवठादारावर बंधनकारक असेल, अशा परत न नेलेल्या मालाचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी न्यासावर असणार नाही व अशा पुरवठा केलेल्या मालाच्या अनुषंगाने कोणतेही प्रदान/अदायगी केली जाणार नाही

१५) बिलामध्ये मूळ दर व अतिरीक्त कर दराचा उल्लेख करावा. प्रचलित नियमानुसार आवश्यक तेथे आयकर कपात केली जाईल. देयक सादर करतांना देयकात, खरेदी आदेशातील वर्णनाप्रमाणेच मालाचे नावाचा पुरवठा करणेत आलेल्या मालाची तपासणी करून, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात येईल. मालाच्या पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१६) पुरवठादारास देयकाची रक्कम कंपनीच्या नावे आर.टी.जी.एस.द्वारे अदा करण्यात येईल.

१७) आपात्कालीन परिस्थितीत उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.

१८) दरपत्रके भरताना तांत्रिक कागदपत्रे आणि मुल्य दरपत्रक दोन वेगवेगळया मोहोरबंद लखोटयात **गुरूवार दि. २४ एप्रिल, २०२५ दु. २.००** वा न्यासाच्या नोंदणी शाखेत सादर करावीत.

१९) **शुक्रवार दि.२५ एप्रिल,२०२५ दु. २.००** तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडण्याच्या वेळी कंत्राटदार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी कृपया उपस्थित रहावे.

(डॉ.संदिप राठोड)
उप कार्यकारी अधिकारी

# मुल्य दरपत्रकाचा तपशील

विषय:— महाप्रसाद विभागात बनविण्यात येणाऱ्या लाडुमध्ये वापरण्याकरीता जायफळ पावडरची विहित पध्दतीने दरपत्रके मागवून खरेदी करणेबाबत

नाव:————————————————————————

पत्ता:————————————————————————

————————————————————————

पॅनकार्ड क्रमांक :——————————————————

सेवाकर नोंदणी क्रमांक :——————————————————

| अ. क्र. | कच्च्या मालाचा तपशील | प्रती किलो दर (कर वगळून—सर्व समावेशक खर्चासह मूळ दर) |
|---|---|---|
| | जायफळ पावडर | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का